।। बहुजन हिताय । बहुजन सुखाय ।।

४१ वर्षापासून नियमितपणे प्रकाशित होणारे जनसामान्यांच्या प्रश्नांचा ध्यास असणारे एकमेव निर्भिड...

४२

साप्ताहिक

# माणदेश वार्ता

संस्थापक संपादक :
स्व.मारुती शिवाजी सोनवणे (एम.ए.)

स्थापना
६ नोव्हेंबर १९८३

RNI NO.
MAH/MAR/2004/16467

POSTAL REGD.
L2/RNP/PPR/04/2024-2026

FACEBOOK
MANDESH VARTA

सांगोला | जुने वर्ष ४२ वे नवीन वर्ष २२ वे | रविवार दि १२ ऑक्टोबर २०२५ | पाने ४ | मूल्य १ ₹ | अंक ४२ वा


## स्व. आमदार गणपतरावजी देशमुख यांच्या घरावर झालेल्या भ्याड हल्ल्याच्या निषेधार्थ सांगोला शहर व तालुक्यात कडकडीत बंद



सांगोला: स्व. आमदार गणपतरावजी देशमुख यांच्या घरावर झालेल्या भ्याड हल्ल्याच्या निषेधार्थ सांगोला शहर व तालुक्यात कडकडीत बंद पाळण्यात आला होता. बंद दरम्यान सांगोला तालुक्यातील सर्व गावे बंद ठेवण्यात आली होती.

सांगोला तालुक्यातील शेतकरी कामगार पक्ष, शिवसेना शिंदे गट व राष्ट्रवादी अजित पवार पक्षामधील कार्यकर्त्यांनी १० ऑक्टोंबर रोजी भाजपमध्ये प्रवेश केला. प्रवेश कार्यक्रमाच्या अगोदर शहरातून रॅली काढण्यात आली होती. या रॅली दरम्यान महाराष्ट्र राज्यातील विधानसभेचे ११ वेळा प्रतिनिधित्व केलेले स्व .गणपतरावजी देशमुख यांच्या निवासस्थानावर अज्ञात व्यक्तीने दारूची बाटली फेकून हल्ला केला होता. या भ्याड हल्ल्याच्या निषेधार्थ सांगोल्यात शनिवार दि.११ ऑक्टोंबर रोजी कडकडीत बंद पाळण्यात आला होता.

विशेष म्हणजे शनिवारी सकाळी नऊ वाजता कार्यकर्त्यांकडून स्वर्गीय भाई गणपतराव देशमुख यांच्या निवासस्थानी त्यांच्या फोटोवर दुग्धाभिषेक करून गोमूत्राने परिसराची स्वच्छता करण्यात आली.या निषेध मोर्चास राष्ट्रीय समाज पक्ष, पारधी समाज संघटना, काँग्रेस आय कमिटी यांचेकडून पाठिंबा देऊन निषेध व्यक्त केला. प्रारंभी म.फुले चौक ते तहसिल कार्यालय या दरम्यान रॅली काढून निषेध करण्यात आला. रॅली दरम्यान अमर रहे अमर रहे स्वर्गीय भाई गणपतराव देशमुख अमर रहे, हल्ला करणाऱ्या आरोपींचा निषेध असो , आरोपीला तात्काळ अटक झालीच पाहिजे अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला.

आम.डॉ.बाबासाहेब देशमुख यावेळी म्हणाले. दीपावली सणाच्या तोंडावर बंदची हाक देणे उचित न्हवते, परंतु लोकांच्या भावना तीव्र असल्यामुळे लोकांकडून हा बंद पुकारण्यात आला आहे आबासाहेबांच्या बंगल्यावर म्हणजेच तालुक्याच्या दृष्टीने न्याय मंदिरावर हल्ला झाला आहे. आबासाहेब यांनी तालुका एका उंचीवर नेला.. परंतु बंगल्यावर झालेल्या हल्ल्यामुळे कधी ही न पुसणार काळा डाग सांगोला तालुक्याला लागला असून आबासाहेब यांचे विचार आपण सर्वांनी जपूया,असे सांगत कुणाच्या केसाला धक्का लागणार नाही याची जबाबदारी माझी असल्याचे शेवटी त्यांनी सांगितले.

डॉ.अनिकेत देशमुख म्हणाले, आबासाहेब यांची वास्तू ही तालुक्याच्या विकासाची साक्षीदार आहे..६० वर्षात कधीही कोणीही एक खडा फेकण्याची हिंमत केली नाही. ज्यांनी कोणी ही घटना केली त्यांनी आता विचार करण्याची वेळ आली आहे की आपण कोणत्या लोकांना ताकद देतोय.कोणत्या प्रवृत्तीला खतपाणी देतोय याचा विचार करावा लागेल.,आबासाहेबांनी सुसंस्कृत राजकारणाची दिशा दिली. सांगोला तालुका हा सुसंस्कृत तालुका म्हणून प्रसिद्ध आहे. पुढेही असाच राहील यांसाठी आमचा प्रयत्न राहणार आहे.ज्यांचे जे कर्म आहे ते भोगतील असा.टोला लावत आपली विचारधारा सोडू नका, तालुक्यातील शांततेला यापुढील काळात काळीमा लागणार नाही यासाठी मी व आमदार डॉ.बाबासाहेब देशमुख प्रयत्न करणार असल्याचे सांगितले.

यावेळी ज्येष्ठ नेते बाबुराव गायकवाड, अतुल पवार, तुषार इंगळे, नंदकुमार शिंदे अरविंद केदार, बापू ठोकळे, नंदू शिंदे, संकेत काळे, कल्पनाताई शिंगाडे, किरण सरगर, यांनी आपले मनोगत व्यक्त करून हल्ला करणाऱ्यांचा निषेध व्यक्त करून आरोपीस तत्काळ अटक करण्याची मागणी केली.

मोर्चाप्रसंगी चंदन होनराव, शिवाजीनाना बनकर, दत्ता सावंत, राजकुमार पवार यांच्यासह सर्वपक्षीय कार्यकर्ते नेते कार्यकर्ते मोठ्या ज्यावेळी हल्ला झाला त्यावेळी निवासस्थानी स्वर्गीय भाई गणपतराव देशमुख यांच्या धर्मपत्नी रतनबाई गणपतराव देशमुख (वय ८७) या एकट्याच घरी होत्या. विद्यमान आमदार डॉक्टर बाबासाहेब देशमुख हे नियोजित कार्यक्रमामुळे परगावी होते. हल्ल्याची बातमी वाऱ्यासारखी तालुक्यात पसरल्यामुळे निवासस्थानासमोर काही वेळ गोंधळाची परिस्थिती निर्माण झाली होती परंतु आमदार डॉक्टर बाबासाहेब देशमुख यांनी परिस्थितीचे गांभीर्य ओळखून कार्यकर्त्यांना शांतता राखण्याचे आवाहन केले होते. त्यामुळे शहर व परिसरात एकच शांतता पसरली होती. संख्येने उपस्थित होते.

बंद दरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडू नये म्हणून उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. बसवराज शिवपुजे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक विनोद घुगे यांनी कडेकोट बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.

## सांगोला तालुक्यातील प्रत्येक कार्यकर्त्याला पक्षात योग्य स्थान दिले जाईल : ना.जयकुमार गोरे

### सांगोला येथे भाजप पक्ष प्रवेश सोहळा उत्साहात संपन्न



सांगोला : मी मंत्री असो किंवा नसो, तुम्ही दाखविलेला विश्वास कधीही व्यर्थ जाणार नाही. सांगोला तालुक्यातील प्रत्येक कार्यकर्त्याला पक्षात योग्य स्थान दिले जाईल. आम्ही राजकारणासाठी नाही, तर विकासासाठी कार्य करतो. तालुक्याच्या पाणी प्रश्नांसह इतर विकास कामांसाठी मी स्वतः पुढाकार घेणार आहे. आगामी निवडणुकीत पक्षाची ताकद निश्चितपणे दाखवून दिली जाईल, असा विश्वास नामदार जयकुमार यांनी व्यक्त केला.

या कार्यक्रमाला अक्कलकोटचे आमदार सचिन कल्याणशेट्टी, आमदार देवेंद्र कोठे, जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार, ब्रह्मानंद पडळकर, श्रीकांत देशमुख आदी मान्यवर उपस्थित होते.

गेल्या काही दिवसांपासून शेतकरी कामगार पक्षातील अनेक कार्यकर्ते नाराज होते आणि त्यांनी पक्षाशी असलेले अंतर लपवले नव्हते. हेच कार्यकर्ते आज भाजपच्या व्यासपीठावर दाखल झाले. त्यामध्ये उद्योगपती शेकापचे बाळासाहेब एरंडे, शिवसेना शिंदे गटाचे उद्योगपती भाऊसाहेब रुपनर, शेकापचे माजी जिल्हा परिषद सदस्य ॲड.सचिन देशमुख, पंचायत समितीचे माजी सभापती बाळासाहेब काटकर, माजी जि.प.सदस्य राणीताई दिघे, जुबेर मुजावर, सरपंच दिपाली खांडेकर, सरपंच संजय इंगोले, धनाजी पांढरे, माजी सरपंच तानाजी नरळे, लोणारी संघटनेचे संतोष कारंडे, माजी नगरसेवक स्वाती मगर, सौ.शोभा फुले या दिग्गजांसह वाकी शिवणे गावातील सुमारे शंभर मुस्लिम कार्यकर्ते यांचा समावेश आहे.

या प्रवेशात विविध गावांचे सरपंच, उपसरपंच, सोसायटी अध्यक्ष आणि कार्यकर्ते सहभागी झाले. हा भव्य पक्षप्रवेश सोहळा पालकमंत्री तथा ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे आणि माजी खासदार रणजितसिंह नाईक–निंबाळकर यांच्या उपस्थितीत संपन्न झाला.

यावेळी बोलताना पालकमंत्री जयकुमार गोरे म्हणाले, मी द्वेषाचे राजकारण केले नाही व करणार नाही असे सांगून पालकमंत्री गोरे पुढे म्हणाले की आज भाजपात प्रवेश करणारे इतिहास घडविणारे नेते आहेत त्यांना अडवण्याचा प्रयत्न केला आहे परंतु प्रत्येकाला आपला पक्ष मजबूत करण्याचा अधिकार आहे. लोकसभा निवडणूक प्रसंगी माजी आमदार शहाजीबापू पाटील, दीपकआबा साळुंखे पाटील तसेच आज शेकाप व इतर पक्षातून असंख्य प्रवेश करणारे नेते गण यांनी त्यावेळी भाजप पक्षाला साथ दिलेली आहे व ते आमच्याबरोबर होते आजचा प्रवेश हा ट्रेलर आहे. येत्या पंधरा दिवसात मुख्यमंत्री यांच्या साक्षीने दुसऱ्या प्रवेशाचा टप्पा होणार असून त्या वेळी तुम्हाला पिक्चर दिसून येईल. मी मंत्री असो अगर नसो माझ्या पाठीमागे देवा भाऊ सह आधी मंत्री व नेते आहे त्यामुळे प्रवेश करणाऱ्यांनी घाबरू नका, विकासाचे राजकारण ही पक्षाची भूमिका असल्याची सांगत अतिवृष्टीने ज्यां शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे त्या सर्वांना मदत दिली जाईल असे आश्वासन ना.गोरे यांनी दिले. सांगोला तालुक्यातील शेतकरी कामगार पक्षाच्या अनेक प्रमुख कार्यकर्त्यांनी आज भारतीय जनता पक्षात प्रवेश करून तालुक्यातील राजकीय समीकरणांमध्ये मोठी हालचाल निर्माण केली आहे. कार्यक्रमाचे प्रास्ताविक जिल्हाध्यक्ष बाळासाहेब केदार यांनी केले. यावेळी स्वाती मगर, पोपट गडदे, भाऊसाहेब जयाभाऊ आणि रणजितदादा, तुम्ही सांगितल्याप्रमाणेच मी वागलो, सध्या सांगोल्यातील जनता संकटात आहे, त्यामुळे आता जनतेचे प्रश्न तुम्हाला मार्गी लावावे लागणार आहेत. मी प्रामाणिकपणे आबासाहेबांचे काम केले आहे. ज्यांच्यासोबत राहिलो त्यांचे सोबत प्रामाणिक राहिलो आहे. मी खोटे कधी बोलत नाही, आणि खोटे बोलून मला काही मिळवायचे नाही. जया भाऊ सांगोला मतदारसंघातील मतदारांची जबाबदारी आता तुमची आहे.

यावेळी ना.जयकुमार गोरे, पालकमंत्री, सोलापूर जिल्हा रुपनर, सुशांत फुले, जुबेर मुलाणी, उल्हास धायगुडे, संभाजी आलदर, अशोक पवार, बाळासाहेब काटकर, सचिन देशमुख, ब्रह्मदेव पडळकर आदींनी आपली मनोगते व्यक्त केली.

# पुणे विभाग पदवीधर आणि शिक्षक मतदार संघासाठी पदवीधर-शिक्षक मतदार नोंदणीचा कार्यक्रम सुरु

सोलापूर : पुणे विभाग पदवीधर आणि शिक्षक मतदार संघासाठी उत्तर सोलापूर तालुक्यामध्ये मतदार नोंदणीला प्रारंभ झाला आहे. मतदार नोंदणीची शेवटची तारीख ६ नोव्हेंबर २०२५ आहे. या तारखेपूर्वी दोन्ही मतदार संघांकरिता पात्र व्यक्तींनी अर्ज करावेत असे अवाहन पदनिर्देशित अधिकारी श्री सदाशिव पडदुणे यांनी केले आहे.

भारत निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार पुणे विभागाच्या पदवीधर व शिक्षक मतदार संध्याच्या निवडणूकांकरिता ०१ नोव्हेंबर २०२५ या अर्हता दिनांकावर आधारित नवीन मतदार याद्या तयार करण्याचा कार्यक्रम जाहीर करण्यात आलेला आहे. उत्तर सोलापूर तालुक्यासाठी सोलापूर शहरामध्ये पदवीधर मतदार संघाकरिता २४ मतदान केंद्रे आणि शिक्षक मतदार संघाकरिता ५ मतदान केंद्रे तयार करण्यात आलेली आहेत. पदवीधर मतदार संघाकरिता फॉर्म नंबर १८ तर शिक्षक मतदार संघाकरिता फॉर्म १९ भरून द्यावयाचे आहे. नियुक्त करण्यांत आलेले पदनिर्देशित अधिकारी व त्यांचे कार्यक्षेत्र खालील प्रमाणे आहेत.

श्री निलेश पाटील मोबाईल नंबर ९६२३४५८७१५, तहसीलदार उत्तर सोलापूर

अतिरिक्त पदनिर्देशित अधिकारी श्री विठ्ठल जाधव मोबाईल नंबर ७६२०५२६२३२ मतदान क्षेत्राचे नाव- तिऱ्हे शेळगी.

तहसीलदार कुळ फायदा- सैपन नदाफ मोबा.नंबर ८३७९९८१७९९, अतिरिक्त पदनिर्देशित अधिकारी सुधाकर बंडगर मोबा.नंबर ९८८१७४१३११. मतदान क्षेत्राचे नाव सोरेगाव मजरेवाडी.

तहसीलदार सं. गा.यो- श्रीमती शिल्पा पाटील मोबा.नंबर ९६२३४५८७१०, अतिरिक्त पदनिर्देशित अधिकारी, चंद्रकांत हेडगिरे, मोबा.नंबर ९४२३०३५४०६ मतदान क्षेत्राचे नाव- कोंडी ,बाळे.

गट विकास अधिकारी, पं. समि. उत्तर सोलापूर, राजाराम भोंग मोबा.नंबर ८६६८४२९१२७ , अतिरिक्त पदनिर्देशित अधिकारी, बाबासाहेब चंद्रकांत पाटील मोबाईल नंबर ९९६०१८७३७५ मतदान क्षेत्राचे नाव- वडाळा मार्डी.

सहाय्यक आयुक्त सोमपा. सोलापूर गिरीश पंडित मोबा.नंबर ८२३७६७८८३६,

अतिरिक्त पदनिर्देशित अधिकारी रियाज कुरणे मो.नंबर ९८८१८९९२९२, मतदान क्षेत्राचे नाव कसबे सोलापूर शहर. सहाय्यक आयुक्त सो म पा श्रीमती मनीषा मगर मोबा.नंबर ९७३०९४८९३०,अतिरिक्त पद निर्देशित अधिकारी रियाज कुरणे ,मो.नंबर ९८८१८९९२९२ , मतदान क्षेत्राचे नाव कसबे सोलापूर शहर.

तरी पात्र मतदारांनी मतदार नोंदणीच्या कामासाठी वर नमूद केलेल्या महसुली मंडळा नुसार अधिकाऱ्यांशी संपर्क साधावा असे आवाहन मतदार नोंदणी अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी सोलापूर क्रमांक १ यांनी केले आहे.

मतदार नोंदणी कार्यक्रमाचे टप्पे- सूचना प्रसिद्धी- (मतदार नोंदणी अधिनियम, १९६० च्या कलम ३१ (३) नुसार जाहीर सूचना दि. ३० सप्टें २०२५ (मंगळवार) रोजी प्रसिद्ध केली जाईल.

वर्तमानपत्रातील नोटीसची प्रथम पुनर्प्रसिद्धी - दि १५ ऑक्टोबर २०२५ (बुधबार) रोजी वर्तमान पत्रात नोटीस पुन्हा प्रसिद्ध केली जाईल.

वर्तमानपत्रातील नोटीसीची द्वितीय पुनर्प्रसिद्धी- दि. २५ ऑक्टोबर २०२५ (शनिवार) रोजी नोटीसीची दुसरी पुनर्प्रसिद्धी केली जाईल.

दावे व हरकती स्वीकारण्याचा अंतिम दिनांकः -प्रकरणानुसार नमुना १८ किवा १९ द्वारे दावे आणि हरकती स्वीकारण्याचा अंतिम दि.०६ नोव्हेंबर २०२५ (गुरुवार) आहे.

हस्तलिखिते तयार करणे व प्रारूप मतदार याद्यांची छपाई:- दि. २० नोव्हेंबर २०२५ (गुरुवार) पर्यंत हस्तलिखिते तयार करणे आणि प्रारूप मतदार याद्याची छपाई करणे अपेक्षित आहे.

प्रारूप मतदार याद्यांची प्रसिद्धी- प्रारूप मतदार याद्या दि. २५ नोव्हेंबर २०२५ (मंगळवार) रोजी प्रसिद्ध केल्या जातील.

दावे व हरकती स्वीकारण्याचा कालावधीः- मतदार नोंदणी अधिनियम, १९६० च्या कलम १२ अंतर्गत दावे व हरकती दि. २५ नोव्हेंबर २०२५ (मंगळवार) ते दि. १० डिसेंबर २०२५ (बुधवार) या कालावधीत स्वीकारल्या जातील.

दावे व हरकती निकाली काढणे व पुरवणी यादी तयार करणे:- दावे व हरकती निकाली काढून पुरवणी यादी तयार करणे आणि तिची छपाई दि. २५ डिसेंबर २०२५ (गुरुवार) पर्यंत केली जाईल.

मतदार यादीची अंतिम प्रसिद्धी: मतदार यादीची अंतिम प्रसिद्धी दि ३० डिसेंबर २०२५ (मंगळवार) रोजी होईल.

पात्र मतदारांनी जास्तीत जास्त फॉर्म भरून आपले नांव नोंदवावे. असे अवाहन मतदार यांना करण्यात येत आहे. https://mahaelection.gov.in वेबसाईटवर पदवीधर नोंदणीची सुविधा उपलब्ध आहे. तसेच दोन्ही मतदार संघासाठी ऑफलाईन फॉर्म तहसिल कार्यालय उत्तर सोलापूर येथील निवडणूक शाखेत उपलब्ध करणेत आले आहे.

# सांगोला तालुक्यातून सर्वोच्च न्यायालयातील घटनेचा निषेध

## भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव मंडळ सांगोला यांच्या वतीने सांगोला तहसीलवर मोर्चा काढून दिले तहसीलदारांना निवेदन

सांगोला : सांगोला येथील विश्वरत्न, विश्वभूषण प.पू. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव मंडळ यांनी सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश मा. भूषण गवई यांच्यावर दिल्ली येथे घडलेल्या बूटफेक प्रकरणाचा तीव्र निषेध नोंदवला असून, संबंधितावर देशद्रोह व अट्रॉसिटी चा गुन्हा दाखल करावा. अशी मागणी जयंती मंडळ उत्सवाच्या वतीने तहसील कार्यालयावर मोर्चा काढून तहसिलदार यांच्याकडे निवेदनाद्वारे मागणी करण्यात आली आहे. दि.११ ऑक्टोबर २०२५ रोजी दिलेल्या या निवेदनात मंडळाचे अध्यक्ष आयु. नरेश बापू बनसोडे, खजिनदार आयु. प्रविण तुकाराम बनसोडे, आणि सचिव आयु. विकास नाना बनसोडे यांच्यासह जयंती उत्सव मंडळाचे पदाधिकारी कार्यकर्ते व भीम सैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, दिनांक ६ ऑक्टोबर २०२५ रोजी दिल्लीतील सर्वोच्च न्यायालयात कोर्ट हॉल क्रमांक २ मध्ये राकेश किशोर या वकिलाने सरन्यायाधीश मा. भूषण गवई साहेबांवर बूटफेक करून अत्यंत भ्याड हल्ला केला. ही घटना म्हणजे भारतीय संविधानाने निर्माण केलेल्या घटनात्मक संस्थेवर झालेला हल्ला असून, त्याचा निषेध करता येईल तेवढा कमीच आहे. तसेच, दिल्ली पोलिसांनी या गंभीर घटनेनंतरही संबंधित इसमावर कोणतीही कडक कारवाई न करता त्याला सन्मानपूर्वक घरी पाठवले, ही बाब संतापजनक असल्याचे निवेदनात म्हटले आहे.

केंद्र सरकार व गृहमंत्रालयाने याची तात्काळ दखल घेऊन कडक कारवाई करणे आवश्यक असल्याचे मंडळाने नमूद केले आहे.या घटनेमुळे देशातील दलित व बहुजन समाजाच्या भावना दुखावल्या गेल्या असून, सोशल मीडियावर काही अतिरेकी घटकांकडून त्या कृत्याला पाठिंबा दिला जात आहे. अशा व्यक्तींवरही तात्काळ कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे. जर शासनाने तात्काळ कारवाई केली नाही, तर सांगोला तालुक्यातील बौद्ध व बहुजन समाज संघटना तीव्र स्वरूपाचे जनआंदोलन छेडतील असा इशारा निवेदनात दिला आहे.

यावेळी किशोर बनसोडे, सागर बनसोडे, संभाजी ब्रिगेडचे जिल्हा उपाध्यक्ष अरविंद भाऊ केदार, बहुजन नेते बापूसाहेब ठोकळे, शिवसेनेचे युवा नेते तुषार इंगळे, दलितमित्र प्रभाकर कसबे गुरुजी यांच्यासह आदी मान्यवरांनी मनोगत व्यक्त केले. मनोगतात त्यांनी सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश भूषण गवई यांच्यावरील बूट फेक प्रकरणाबाबत वकील राकेश किशोर यांच्यावर कठोर कारवाई करावी. अॅट्रॉसिटीचा गुन्हा दाखल करावा अशी मागणी केली. यावेळी भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव मंडळाच्या वतीने व बौद्ध समाजाच्या वतीने सांगोला तहसील कार्यालयावर मोर्चा काढून तहसीलदार यांना निवेदन देण्यात आले. यावेळी समाज बांधव ,पदाधिकारी कार्यकर्ते ,महिला भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सह्याद्री फार्मसी कॉलेजची जागतिक औषधनिर्माता दिन रॅली जल्लोषात संपन्न

सांगोला : जागतिक औषधनिर्माता दिनानिमित्त सह्याद्री कॉलेज ऑफ फार्मसी मेथवडे महाविद्यालयातर्फे सांगोला शहरात भव्य अशा रॅलीचे आयोजन करण्यात आले होते.सांगोला शहरातील थोर महापुरुषांच्या पुतळ्यास प्रमुख पाहुण्यांच्या व नागरिकांच्या हस्ते हार पुष्पगुच्छ घालून मानवंदना देऊन रॅली सांगोला शहरातून काढली.

या रॅलीची सुरवात महात्मा फुले चौकातून झाली. प्रमुख पाहुणे उद्योजक श्री.बाळासाहेब आसबे, श्री.नवनाथ पवार, श्री.रमेश जाधव, संस्थेचे संस्थापक अध्यक्ष डॉ.दिलीपकुमार इंगवले, सांगोला तालुका ड्रगिस्ट व केमिस्ट असोसिएशनचे अध्यक्ष श्री.सुनील कोरे व त्यांचे सर्व सहकारी, संस्था सचिवा सौ.अनिता दिलीपकुमार इंगवले, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.मनोजकुमार पाटील यांच्या हस्ते समाजसुधारक महात्मा फुले यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून तसेच श्रीफळ फोडून या रॅलीचे उदघाटन झाले. विद्यार्थी विविध घोषणा देत, फलकाद्वारे जनजागृतीचे संदेश देत पुढे नेहरू चौकात आल्यानंतर माजी पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या पुतळ्यास प्रतिष्ठित नागरिक श्री.श्रीकांत घोंगडे व सामाजिक कार्यकर्ते श्री.सुभाष गावडे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून रॅली पुढे शिवाजी चौकात आल्यानंतर छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास श्री.अरविंद केदार, श्री.बापू भाकरे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांना श्री.अरविंद केदार यांनी मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी याठिकाणी पथनाट्य सादर करून डॉक्टर व फार्मासिस्ट यांचे मार्गदर्शन व सल्ले न घेता अंधश्रद्धा व भोंदूगिरी मुळे नागरिकांचे आर्थिक व आरोग्याचे कसे नुकसान होते हे अतिशय मार्मिकपणाने उपस्थित नागरिकांना सांगितले.

उपस्थित नागरिकांनी या पथनाट्याचे कौतुक केले. माजी नगरसेवक श्री.चंदन होनराव, श्री.बापूसाहेब ठोकळे यांच्या हस्ते लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्यास पुष्पहार, गुच्छ घालून रॅली पुढे विविध घोषणा व फलकाद्वारे संदेश देत तहसील कार्यालयाजवळ आल्यानंतर विश्वभूषण डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास सामाजिक कार्यकर्ते श्री.बापूसाहेब ठोकळे, माजी नगरसेवक श्री.किशोर बनसोडे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला.

यावेळी रॅलीस श्री.बापूसाहेब ठोकळे यांनी मार्गदर्शन केले. अहिल्यादेवी होळकर चौकात आल्यानंतर पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या पुतळ्यास शिवसेना युवा नेते श्री.सागर पाटील, धडाडीचे उद्योजक श्री.धनंजय शिंदे, श्री.बापूसाहेब ठोकळे, श्री.किशोर म्हमाणे यांनी पुष्पहार अर्पण केला.

विद्यार्थ्यांनी याठिकाणी पथनाट्य सादर करून फार्मासिस्टचे राष्ट्रीय आरोग्य अभियान व सामाजिक कार्यामधील स्थान, भूमिका व योगदान अतिशय प्रभावीपणे पथनाट्याद्वारे विशद केले.या पथनाट्याचे उपस्थित सर्व नागरिकांनी कौतुक केले.तसेच यावेळी विद्यार्थ्यांनी व उपस्थित नागरिकांनी नशामुक्तीची शपथ घेतली.

साप्ताहिक माणदेश वार्ता हे साप्ताहिक मालक, प्रकाशक, संपादक सोनवणे रोहित मारूती यांनी मुद्रक माळी अशोक बाळकृष्ण यांच्या बाळकृष्ण ऑफसेट प्रिंटर्स,नेहरू चौक, कोर्टा जवळ, सांगोला, जि. सोलापूर येथे छापून १२७९ अ भारत गल्ली, सांगोला, जि.सोलापूर येथे प्रसिद्ध केले. E-Mail- mandesh_varta@rediffmail.com
संपादक : सोनवणे रोहित मारूती (या अंकातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.) . जुने वर्ष-४२ वे अंक-४५ वा मो. ९४२०६६६५०१, ९०२८५९१४३१

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचा युवा महोत्सव उन्मेष सृजनरंगाचा २०२५ सांगता समारंभ उत्साहात संपन्न



सर्वसाधारण विजेते– श्री शिवाजी महाविद्यालय,बार्शी, उपविजेते– संगमेश्वर महाविद्यालय, सोलापूर

सांगोला : पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या २१व्या उन्मेष सृजनरंग २०२५ युवा महोत्सवाचा सांगता समारंभ सांगोला महाविद्यालयात दिमाखदार व उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

चार दिवस चाललेल्या या महोत्सवात सोलापूर जिल्ह्यातील ५३ महाविद्यालयांनी सहभाग घेत, नृत्य, नाट्य, संगीत, ललित वाङ्मय, ललितकला अशा ३९ कलाप्रकारांमध्ये विद्यार्थ्यांनी आपले सृजनशीलतेचे कौशल्य सादर केले. या कार्यक्रमाची सुरवात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमा पूजनाने झाली. सर्व मान्यवरांचा सत्कार विदयापीठ व महाविद्यालयाच्यावतीने करण्यात आला. युवा महोत्सव दरम्यान सांगोला महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागामार्फत पूरग्रस्तासाठी मदत निधी संकलन केंद्राकडून संकलीत झालेली मदत पेटी मा.कुलगुरु महोदय यांच्याकडे प्रमुख पाहुणे सिनेअभिनेते मकरंद अनासपुरे यांच्याहस्ते सुपूर्द करण्यात आली.

प्रास्ताविकपर भाषण करताना विद्यार्थी विकास विभागाचे संचालक, प्रा. डॉ. केदारनाथ काळवणे यांनीही विद्यार्थ्यांच्या प्रतिभेचे आणि परीक्षकांच्या मार्गदर्शनाचे विशेष कौतुक केले. संस्थाध्यक्ष बाबुराव गायकवाड यांनी आपल्या स्वागतपर भाषणात सांगितले की, विद्यार्थी, शिक्षक आणि कर्मचाऱ्यांच्या अखंड परिश्रमांमुळे हा महोत्सव यशस्वी झाला. त्यांनी पत्रकार बांधवांचे विशेष आभार मानले, ज्यांच्या सहाय्याने महोत्सवाला व्यापक प्रसिद्धी मिळाली. विद्यापीठाने दाखवलेल्या विश्वासास आम्ही पात्र ठरलो, असे सांगत त्यांनी आपली कृतज्ञता व्यक्त केली. स्पर्धकांनी मनोगत व्यक्त करताना सांगोला महाविद्यालयाने केलेल्या निवास, भोजन व शिस्तबद्ध व्यवस्थेचे मन:पूर्वक कौतुक केले.

परीक्षक म्हणून सहभागी झालेल्या माधुरी पाटील (नांदेड) यांनी महाविद्यालयाच्या अतिशय आदर्श संयोजनाची, विशेषत: पूरस्थिती असतानाही केलेल्या सुरळीत व्यवस्थापनाची प्रशंसा केली. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना त्यांनी भरभरून दाद दिली व सोलापूर विद्यापीठाच्या प्रगतीचे अभिनंदन केले.

प्रसिद्ध अभिनेते मकरंद अनासपुरे यांनी आपल्या खास शैलीत उपस्थित विद्यार्थ्यांना अनेक जीवनमूल्यांची शिकवण दिली. ज्यांना बक्षीस मिळाले त्यांचे अभिनंदन, पण ज्यांना मिळाले नाही त्यांचे विशेष अभिनंदन, कारण पराभवातूनच माणूस शिकतो, असे सांगत त्यांनी सातत्य, शिस्त, व्यसनमुक्त जीवनशैली, हुंडा प्रथेविरोधातील ठाम भूमिका, पर्यावरण संरक्षण, आणि स्वतःचा परीक्षक बनून सतत सुधारणा करत राहण्याचा व आपल्या भाषेचा, आपल्या माणसांचा अभिमान बाळगायला शिका असा सल्ला विद्यार्थ्यांना दिला. त्यांनी सांगोला महाविद्यालयाच्या आयोजनाचे आणि विद्यार्थ्यांच्या उत्साहाचे विशेष कौतुक केले. आपल्या मनोगतात त्यांनी महाविदयालयाच्या माणदेश नियतकालिकातील महाविदयालयाचा विदयार्थी श्रीकांत देशमुख यांच्या कवितेविषयी गौरव उद्‌गार काढले. तसेच सांगोला परिसरातील माणनदी नदी पुर्नजीवीत करण्याचे काम करणा–या श्री.वैजिनाथ घोंगडे यांचे विशेष अभिनंदन केले.

यावेळी कुलगुरू डॉ. प्रकाश महानवर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, माणदेशातील संघर्षातून घडलेले विद्यार्थीच यशाचे शिखर गाठतात असे उद्‌गार काढले. सातत्य, मेहनत व संस्कृती जपणे हे जीवनाचे खरे मूल्य आहे असे सांगितले. यावेळी बोलताना ते पुढे म्हणाले, उन्मेष सृजनरंग २०२५ हा केवळ एक सांस्कृतिक महोत्सव नव्हता, तर विद्यार्थ्यांच्या आत्मविश्वास, प्रतिभा आणि समाजाभिमुखतेचे एक प्रभावी दर्शन होता. सांगोला महाविद्यालयाने केलेल्या अचूक आयोजनामुळे हा महोत्सव मुल्याधारित आणि प्रेरणादायी ठरला. त्यांनी विद्यार्थ्यांना पर्यावरण संवर्धन, वृक्षलागवड, नदी



स्वच्छता, तसेच पालकांचा सन्मान व समाजसेवेची भावना बाळगण्याचे आवाहन केले.

युवा महोत्सव उन्मेष सृजनरंग २०२५ स्पर्धेचे यावर्षीचे सर्वसाधारण विजेते पद श्री शिवाजी महाविद्यालय, बार्शी, उपविजेते पद संगमेश्वर महाविद्यालय, सोलापूर तर तृतीय क्रमाक कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय, पंढरपूर यांनी पटकाविला. या युवा महोत्सवामध्ये श्री शिवाजी महाविदयालयाचा विदयार्थी प्रेम सरवदे याचा गोल्डन बॉय तर श्री शिवाजी महाविद्यालय, बार्शी येथील स्नेहल विधाते व संगमेश्वर महाविदयालयाची सई दरेकर चा गोल्डन गर्ल म्हणून गौरव करण्यात आला. तसेच उत्कृष्ट संघ व्यवस्थापक म्हणून श्री शिवाजी महाविद्यालय बार्शी, संगमेश्वर महाविद्यालय, सोलापूर व कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय, पंढरपूर यांचा सन्मान करण्यात आला.

युवा महोत्सव पारितोषिक वितरण व समारोप समारंभाचे आभार प्रदर्शन महाविदयालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. सुरेश भोसले यांनी केले. तर सूत्रसंचालन डॉ.यशपाल खेडकर व कॅप्टन प्रा.संतोष कांबळे यांनी केले.

विदयापीठाचा युवा महोत्सव यशस्वी करण्यासाठी संस्था पदाधिकारी व सदस्य, महाविदयालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. सुरेश भोसले, युवा महोत्सव समन्वयक डॉ. रामचंद्र पवार, सह समन्वयक डॉ. राजकुमार ताठे, प्रा. संतोष लोंढे, प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाच्या सांगता सोहळ्यास विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. प्रकाश महानवर, प्रसिद्ध अभिनेते मकरंद आसपुरे, प्र.कुलगुरू प्रा. लक्ष्मीकांत दामा, प्र. कुलसचिव मा.अतुल लकडे, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. केदारनाथ काळवणे, सांगोला तालुका उच्च शिक्षण मंडळाचे अध्यक्ष मा.बाबुरावजी गायकवाड, उपाध्यक्ष श्री.तात्यासाहेब केदार व श्री प्रा.पी.सी. झपके, सचिव ॲड. उदय(बापू) घोंगडे, सहसचिव श्री. साहेबराव ढेकळे श्री.विश्वनाथ चव्हाण, माजी सचिव श्री. महादेव झिरपे, श्री.शामराव लांडगे, श्री. सुरेश फुले, श्री.चंद्रशेखर अंकलगी, श्री.सुधीर उकळे, श्री.दिनानाथ लोखंडे आदी सदस्य उपस्थित होते. तसेच या समारंभास विदयापीठ युवा महोत्सव समितीचे सदस्य, विविध महाविदयालयाचे संघनायक, मान्यवर पदाधिकारी व विदयार्थी मोठया संख्येने उपस्थित होते

# वंचित बहुजन आघाडी तालुक्यातील समविचारी पक्षांना एकत्र घेऊन स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका लढविणार – तालुकाध्यक्ष विनोद उबाळे

सांगोला : वंचित बहुजन आघाडी सांगोला तालुक्यातील सर्व समविचारी पक्ष, संघटना व विचारवंतांना एकत्र घेऊन येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका पूर्ण ताकदीने लढविणार असल्याची माहिती वंचित बहुजन आघाडीचे सांगोला तालुका अध्यक्ष विनोद उबाळे यांनी दिली.

सांगोला तालुक्यातील प्रस्थापित सत्ताधाऱ्यांविरोधात मजबूत पर्याय उभा करण्यासाठी वंचित बहुजन आघाडी सज्ज झाली आहे. विनोद उबाळे यांनी सांगितले की, तालुक्यातील प्रस्थापित पक्ष आणि त्यांच्या नेत्यांनी गेल्या अनेक वर्षांत जनतेच्या अपेक्षांनुसार काम केले नाही. विकासाच्या नावाखाली केवळ सत्तेची आणि कुटुंबीयांची मक्तेदारी निर्माण केली आहे. त्यामुळे तालुक्यातील सर्व सामान्य जनता, शेतकरी, कामगार, तरुण आणि वंचित घटक यांच्यासाठी खरा पर्याय उभा करणे ही काळाची गरज आहे. त्यांनी पुढे सांगितले की, वंचित बहुजन आघाडीचा मुख्य उद्देश हा शिव, फुले, शाहू, आंबेडकर यांच्या विचारांवर आधारित सामाजिक न्याय, समानता आणि विकास या तत्त्वांवर आधारित राजकारण उभे करणे हा आहे. तालुक्यातील सर्व समविचारी पक्ष, संघटना आणि कार्यकर्त्यांना एकत्र घेऊन एक सशक्त संघटनात्मक रचना उभी केली जाणार आहे. यासाठी पक्षश्रेष्ठींच्या मार्गदर्शनाखाली लवकरच सांगोला तालुकास्तरीय व्यापक बैठक आयोजित करण्यात येणार आहे, असेही तालुकाध्यक्ष विनोद उबाळे यांनी स्पष्ट केले.

त्यांनी सध्याच्या राजकीय स्थितीचा उल्लेख करताना सांगितले की, तालुक्यातील अनेक आजी–माजी नेते आणि पदाधिकारी हे सत्तेच्या लालसेपोटी भारतीय जनता पक्षाशी जवळीक साधत आहेत. मात्र, वंचित बहुजन आघाडी ही नेहमीच भाजप आणि त्यांच्या विचारसरणीविरोधात ठाम भूमिका घेत आली आहे. आम्ही विचारांच्या, विकासाच्या आणि सामाजिक परिवर्तनाच्या राजकारणावर विश्वास ठेवतो. आगामी काळात सांगोला तालुक्यातील ग्रामपंचायत, नगरपरिषद, पंचायत समिती आणि जिल्हा परिषद या सर्वच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये वंचित बहुजन आघाडी पूर्ण ताकदीने आणि संघटित पद्धतीने उतरून जनतेचा विश्वास संपादन करणार आहे.

तसेच विनोद उबाळे यांनी शेवटी आवाहन केले की, सांगोला तालुक्यातील सर्व समाजघटक, संघटना आणि प्रगतिशील कार्यकर्त्यांनी विचारांचे एकत्रिकरण करून अन्याय, विषमता आणि सत्ताधाऱ्यांच्या भ्रष्ट कारभाराविरोधात एकजूट निर्माण करावी. वंचित बहुजन आघाडी ही या लढ्यात अग्रभागी राहील. असेही यावेळी बोलताना त्यांनी सांगितले.

# जयहिंद नागरी सहकारी पतसंस्थेच्या वतीने सभासदांना दिपावली भेटवस्तूंचे वाटप सुरु

सांगोला : जयहिंद (मा.सै.) नागरी सहकारी पतसंस्थेच्या वतीने सालाबादप्रमाणे याही वर्षी सभासदांना लाभांश स्वरुपात दिपावली भेटवस्तूंचे वाटप शनिवार दिनांक ११ ऑक्टोंबर २०२५ रोजी पासून सुरु करण्यात आले आहे . यावर्षी सभासदांना साखर ४ किलो , हरभरा दाळ २ किलो , तेल १ किलो व मोती साबण १ नग या वस्तूंचे वाटप करण्यात येत असून त्यांचा शुभारंभ संस्थेचे चेअरमन श्री.सोमेश यावलकर यांच्या शुभ हस्ते करण्यात आले.

यावेळी संस्थेचे चेअरमन श्री.सोमेश यावलकर, सचिव श्री.धीरज दिवसे, संचालक श्री.अशपाक तांबोळी,श्री श्रीकांत पाटील , श्री.बापूसो देवकते यांच्या उपस्थितीत सभासदांना दिपावली भेटवस्तूंचे वाटप करण्यात आले.



तरी सर्व सभासदांना संस्थेच्या वतीने दिपावली भेटवस्तू घेवून जाणेचे आवाहन करण्यात आले आहे. सर्व सभासदांना भेट वस्तू नेण्यासाठी येताना शेअर्स सर्टिफिकेट घेऊन येण्याची विनंती केली आहे . दिपावली भेटवस्तूंचे वाटप हे दिनांक ११ ऑक्टोंबर ते १८ ऑक्टोंबर २०२५ पर्यंत संस्थेच्या वेळेत सुरू राहणार आहे.

सर्व सभासदांनी १८ ऑक्टोंबर पूर्वी आपल्या भेटवस्तू घेवून जाण्याचे सहकार्य करावे, असे आवाहन संस्थेचे चेअरमन श्री.सोमेश यावलकर यांनी केले आहे. यावेळी या प्रसंगी व्हा.चेअरमन श्री.अंबादास गायकवाड, सचिव श्री.धीरज दिवसे, संचालक श्री.अशपाक तांबोळी, श्री.श्रीकांत पाटील, श्री.बापूसो देवकते, संचालिका सौ.आशा यावलकर तसेच बहुसंख्य सभासद व संस्थेच्या व्यवस्थापक मनिषा देशमुख, क्लार्क विकास म्हमाणे, क्लार्क प्राजक्ता ढोले, बचत प्रतिनिधी श्री.धन्यकुमार बुंजकर, श्री.भारत साळुंखे, श्री.गणेश गुळमिरे , श्री.देवराज लोखंडे, श्री.अविनाश ढोले आदि सर्व उपस्थित होते.

## कोल्हापूर-कलबुर्गी स्पेशल एक्सप्रेस रेल्वे धावते तीन ते साडेतीन तास उशीरा-प्रवाशात व भाविकांत नाराजीचा सुर
### रेल्वे वेळेत व कलबुर्गीहुन रात्री सोडण्याची अशोक कामटे संघटनेची मागणी

सांगोला : कोल्हापूर मिरज कलबुर्गी मार्गावर नुकतीच सकाळच्या सत्रामध्ये धावणारी गाडी क्र. ०१४५१/५२ कोल्हापूर – मिरज – कलबुर्गी स्पेशल एक्सप्रेस सुरु करण्यात आली.

सकाळच्या सत्रामध्ये कोल्हापूर येथून थेट रेल्वे सुरू झाल्यामुळे मिरज, सांगोला,पंढरपूर, सोलापूर, अक्कलकोट, गाणगापूर व तुळजापूर या धार्मिक स्थळांचे दर्शन यात्रेकरिता भाविकांना सोयीची व उपयुक्त अशी गाडी सुरू झालेली आहे. यामुळे येणाऱ्या दिवाळी निमित्त देवदर्शन यात्रा, व सुटीत पर्यटन करणाऱ्या भाविकांची उत्तम सोय झालेली आहे.या गाडीचा स्पेशल दर्जा असल्याने दर ही वाढीव आहेत.तरीही प्रवासी व भाविकांची या गाडीला पसंदी आहे.परंतु या गाडीचे वेळापत्रक पाहिले असता या गाडीसाठी लुज टाइमिंग भरपूर प्रमाणात देण्यात आलेला आहे.

तरीही ही गाडी २४ सप्टेंबर पासून सुरू झालेली असून ही गाडी आज तागायत सुमारे तीन ते साडेतीन तास नेहमी उशिराने धावते.प्रवासात ही गाडी मध्येच एखाद्या स्थानकावर तासनतास थांबवुन ठेवली जाते. यामुळे प्रवाशांनी व भाविकांनी केलेले नियोजन विस्कळीत होते व नाहक त्रास सहन करावा लागतो.

यामुळे प्रवासी वर्गातून नाराजी व्यक्त होत आहे तरी या गाडीचा लूज टाइमिंग कमी करून सकाळच्या सत्रातील कोल्हापूर–कलबुर्गी स्पेशल एक्सप्रेस वेळेवर पोहोचवण्यात यावी व परतीच्या प्रवासासाठी कलबुर्गी येथून रात्री उशिरा नऊ वाजता सोडण्यात याबाबत पुणे, सोलापूर रेल्वे विभागाने तत्परतेने कार्यवाही करावी यावी, अशी मागणी शहीद अशोक कामटे बहुउद्देशीय सामाजिक संघटना यांच्यावतीने केली आहे.

## हॉटेल संगमचे नवनाथ केदार-प्रविण केदार यांना भारतरत्न जे.आर .डी टाटा युवा उद्योजक पुरस्कार प्रदान

महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास परिषद पिंपरी–चिंचवड पुणे यांच्या वतीने भारतरत्न जे.आर .डी टाटा युवा उद्योजक पुरस्कार कमलापूर येथील हॉटेल संगम संचालक नवनाथ केदार–प्रविण केदार यांना नुकताच रयत शिक्षण संस्थेचे चेअरमन सेवानिवृत्त विभागीय आयुक्त चंद्रकांत दळवी यांचे शुभहस्ते पिंपरी चिंचवड येथे झालेल्या भव्य कार्यक्र मात प्रदान करण्यात आला.

सदरील पुरस्कार हा युवा उद्योजकांना प्रेरणा मिळावी या हेतूने दिला जातो.हॉटेल संगम संचालक नवनाथ केदार–प्रविण केदार यांना हा पुरस्कार मिळाल्याने त्यांचे अभिनंदन केले जात आहे.




## सूर्योदय अर्बनच्या वतीने सभासदांना दीपावलीनिमित्त भेटवस्तूचे वाटप
### दहा टक्के लाभांश व साखरेचा गोडवा यामुळे सभासदांमध्ये आनंदाचे वातावरण

सांगोला : सूर्योदय अर्बन को ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी व सूर्योदय अर्बन महिला को–ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लिमिटेड सोलापूर जिल्हा तसेच सुमारे ४३ शाखांच्या माध्यमातून महाराष्ट्र आणि कर्नाटक अशा दोन राज्यांमध्ये कार्यरत असलेली एल के पी मल्टीस्टेट को–ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी या संस्थांच्या वतीने सर्व सभासदांसाठी १० टक्के डिव्हिडंट यापूर्वीच जाहीर करण्यात आलेला असून संस्थेच्या कार्यालयामध्ये डिव्हिडंट वाटप सुरू आहे.

आदर्श नियमावलीनुसार ३१ मार्च २०२४ रोजीच्या शेअर्स रकमेवर डिव्हिडंड देण्यात येत असून डिव्हिडंट शिवाय सभासदांची दिवाळी गोड व्हावी या हेतूने दीपावली सणानिमित्त भेटवस्तू म्हणून ५ किलो साखरेचे वाटप देखील संस्थेमध्ये सुरू असल्याची माहिती या सर्व संस्थांचे संस्थापक अनिलभाऊ इंगवले यांनी दिली. ज्यांचा शेअर्स अडीच हजार रुपयांच्या वर आहे अशा सभासदांनाच भेटवस्तू देण्यात येत आहे. त्यामुळे ज्या सभासद बांधवांचा शेअर्स अडीच हजार रुपयांच्या पेक्षा कमी असेल त्यांनी त्वरित आपल्या शेअर्सची रक्कम अडीच हजार रुपयांच्या वर न्यावी, असे आवाहन देखील यावेळी इंगवले यांनी केले आहे.

अगदी आज जरी आपल्या शेअर्सची रक्कम अडीच हजार रुपयांच्या पुढे नेली तरी देखील त्या सभासद बांधवांना भेटवस्तू म्हणून साखरेचे किट देण्यात येणार असल्याची माहितीही यावेळी त्यांनी दिली. यावेळी संस्थेचे संस्थापक आणि सूर्योदय उद्योग समूहाचे चेअरमन अनिलभाऊ इंगवले यांनी राज्यातील काही आर्थिक संस्था अडचणीत येण्याची



नेमकी कारणे याबद्दल सखोल माहिती सांगत सूर्योदय अर्बन आणि एलकेपी मल्टीस्टेट या संस्थांची कशी वाटचाल सुरू आहे यावर प्रकाश टाकला. कर्ज वितरणाची पद्धत, संस्थेची गुंतवणूक आणि पारदर्शी कारभार यामुळे सूर्योदय संस्था भक्कमपणे वाटचाल करत असून सर्व ठेवीदार आणि सभासद यांनी मनापासून दाखवलेल्या विश्वासास सदैव पात्र राहू असे सांगत सर्वांना दीपावलीच्या शुभेच्छा दिल्या.

यावेळी अरविंदभाऊ केदार, अरुण वाघमोडे गुरुजी आणि प्रा.भारत कसबे यांनीही आपल्या भावना व्यक्त करताना तिन्ही संस्थांच्या वाटचालीबद्दल विशेष कौतुक केले.

यावेळी सूर्योदय अर्बनचे चेअरमन डॉ बंडोपंत लवटे, सूर्योदय मॉल आणि वस्त्रनिकेतनचे जगन्नाथ भगत गुरुजी व एल के पी मल्टीस्टेटचे व्हा.चेअरमन सुभाष दिघे गुरुजी , सूर्योदय महिला अर्बनच्या चेअरमन सौ.अर्चनाताई इंगवले, व्हाईस चेअरमन सौ.ज्योती भगत, संचालिका सौ मीनाक्षी दिघे, सौ.सुरेखाताई लवटे, संचालक संतोष इंगवले, महादेव दिघे सर, सूर्योदय अर्बनच्या सचिव रेशमा कमले यांच्यासह बंडोपंत इंगवले, प्रवीणशेठ गायकवाड, लक्ष्मण तेली गुरुजी, अण्णासो राऊत, समाधान घाडगे इत्यादी सभासद व कर्मचारी वृंद उपस्थित होते.



# ।। भावपूर्ण श्रध्दांजली ।।



कै. चंद्रकांत महादेव खंदारे



कै. नारायण बाजीराव खडतरे

आमचे मंडळाचे ज्येष्ठ सल्लागार कै.चंद्रकांत महादेव खंदारे यांचे
बुधवार दि. ८ ऑक्टोबर २०२५ रोजी दु:खद निधन झाले.तसेच
आमचे मंडळाचे ज्येष्ठ सल्लागार व माजी अध्यक्ष कै.नारायण बाजीराव खडतरे यांचे
दि. ९ ऑक्टोबर २०२५ रोजी दु:खद निधन झाले.
त्यांचे निधनाने खंदारे व खाडे कुटुंबियांवर कोसळलेल्या या दुखा:त आम्ही सहभागी आहोत.
परमेश्वर त्यांच्या आत्म्यास चिरशांती देवो हीच श्री गणेश चरणी प्रार्थना.

शोकाकूल

भारत गल्ली सार्वजनिक गणेशोत्सव मित्रमंडळ (रजि.),सांगोला